MHLA050001232024

लवाद दरखास्त क्र.२१६/२०२४
श्रीराम फायनान्स वि. रामराव

## नि.क्र.१० खालील आदेश

**०१.** दरखास्तदारने अर्ज देवून नमूद केले की, जे.डी.क्र.१ याकामी बजावणी होवूनही दरखास्तीत नमूद रक्कमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे, अर्जासोबत दिलेल्या परिशिष्टातील स्थावर मिळकत या रक्कमेसाठी जप्त होवून त्याची महसुल दप्तरी नोंद होण्याचा आदेश व्हावा अशी विनंती करण्यात आली. अर्जासोबत प्रतिज्ञापत्र नि.क्र.११ देण्यात आले.

**०२.** दरखास्तीत नमूद रक्कम ही ३३,८५६/- एवढी असून जाबदार क्र.१ यांना नि.क्र. ०७ प्रमाणे नोटीस बजावणी झाली आहे. ते हजर झाले नाहीत.

**०३.** दरखास्तीतील रक्कम पाहता आणि निवाडयाची तारीख दि.२६/०८/२०२३ ही पाहता याकामी जाबदारानी रक्कम भरणे किंवा निवाडा आक्षेपीत करणे आवश्यक होते. तसे, त्यांनी केले नाही. जाबदार क्र.१ विरुध्द रक्कम वसुलीचा निवाडा झाला असल्याने त्यांचेविरुध्द आदेश पारीत करता येतो. प्रस्तुत अर्ज जाबदार विरुध्द असल्याने आणि त्याच्या नावे मौजे सोनखेड, ता. अहमदपूर येथे गट क्र.३० मध्ये ९९ आर जमीन असल्याने सदर जमीन जाबदार याने तबदील करु नये किंवा त्यावर बोजा उत्पन्न करु नये आणि त्यातील कोणतेही उत्पन्न किंवा त्या जमिनीचा फायदा कोणाही व्यक्तीने घेवू नये असा आदेश जाबदार विरुध्द करण्यात येतो. दि.प्र.संहिता क्रम २१ नियम ५४ (१)(अ) प्रमाणे जाबदार याने पुढील नेमलेल्या तारखेस न्यायालयात हजर राहून या जप्त मिळकतीच्या विक्री संदर्भाने करावयाचा जाहीरनाम्याच्या अटी व शर्ती ठरविण्यासाठी हजर रहावे. सदरचा आदेश दवंडीद्वारे किंवा सद्यस्थितीत ज्या पध्दतीने या मिळकतीच्या आसपास आणि मौजे सोनखेड, ता. अहमदपूर भागातील लोकांना समजण्यासाठी जाहीर करावा. त्याच्या प्रती मा. जिल्हाधिकारी, लातूर, मा. उपविभागीय अधिकारी (महसुल), अहमदपूर, मा. तहसीलदार, अहमदपूर, तलाठी कार्यालय, मौजे सोनखेड

शेंद्री, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे सोनखेड,  दिवाणी न्यायालय, अहमदपूर आणि प्रत्यक्ष जप्त करावयाची मिळकत या ठिकाणी प्रदर्शीत करावी.

स्वाक्षरीत/-

**दिनांक ०२/०१/२०२६.**

**[एस.एन.सरडे]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.